सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- ९४

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.२०/०८/२०२१ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.७५ ते ठराव क्र.९३ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :- M Bagwan श्री.मेंनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Survase W.

अनुमोदक :- N G Naik सौ.नसीमा नाईक महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- ९५

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.०२ च्या विद्यमान सभापती मा.अप्सरा महेंद्र वायदंडे यांचे पती व महानगरपालिकेचे कर्मचारी महेंद्र वायदंडे यांचे दि.०४/१०/२०२१ रोजी आकस्मिक दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या झालेल्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- श्री.गजानन रामू मगदूम

अनुमोदक :- श्री.विनायक रमेश सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

D P Suryavanshi

महापौर,

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५

दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- ९६

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे माजी उपमहापौर श्री.प्रशांत पाटील ऊर्फ पप्पू मजलेकर यांचे चिरंजीव पार्श्व प्रशांत पाटील-मजलेकर यांचे दि.०८/१०/२०२१ रोजी आकस्मिक दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबियावर दु:खाचा आघात झाला. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबियांच्या झालेल्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- सौ.वर्षा अमर निंबाळकर

अनुमोदक :- श्री.मनोज रघुनाथ सरगर

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Surjavanshi

महापौर,

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- ९७

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली जिल्हा हॅण्डबॉल संघटना कार्यकारणी बैठकीमध्ये सन २०२१-२०२५ साठी नविन कार्यकारणीची निवड करण्यात आली. या निवडीमधून उपस्थितांच्या सर्वानुमते आदरणीय श्रीमती जयश्रीताई मदनभाऊ पाटील (वहिनीसाहेब) यांची सांगली जिल्हा हॅण्डबॉल संघटनेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांच्या या निवडीबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.प्रकाश शामराव मुळके

अनुमोदक :- श्री.करण किशोर जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

D. f. Suryavanshi

महापौर,

महानगरपालिका सांगली

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- ९८

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

काँग्रेस पक्षाच्या नेत्या श्रीमती जयश्री मदनभाऊ पाटील (वहिनी) यांची सांगली जिल्हा हॅण्डबॉल असोसिएशनच्या सन २०२१ ते २०२५ या कालावधीसाठी जिल्हाध्यक्ष म्हणून तसेच महापालिकेचे विद्यमान सदस्य मा.गजानन रामू मगदूम यांची जिल्हा उपाध्यक्ष पदी व प्रा.श्री.जहाँगीर तांबोळी यांची सचिव पदी बिनविरोध निवड करणेत आली त्यांच्या या निवडीबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- सौ.पद्मश्री प्रशांत पाटील

अनुमोदक :- श्री.प्रकाश शामराव मुळके

ठराव सर्वानुमते मंजुर

D/Suryavanshi

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- ९९

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मा.हरिदास पंडीत पाटील यांची सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या स्विकृत सदस्य पदी निवड करणेत आली. त्यांच्या या निवडीबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- सौ.नसिम गैबिसो नाईक

अनुमोदक :- सौ.अपर्णा बजरंग कदम

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५

ठराव क्रमांक :- १००

विषय क्रमांक :- ०२

दिनांक :- २०/१०/२०२१

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या माळबंगला येथील पाणी पुरवठा विभागाच्या ५६ एमएलडी क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्राकडील मोठी गळती दुरुस्त करणेसाठी सांगली व कुपवाड मधील एकूण ७ प्रभागांचा पाणी पुरवठा हा शनीवार पासून बंद होता. पाणी पुरवठा विभागाने दोन दिवस रात्रंदिवस काम करत पाणी गळती दुरुस्त केली. त्यामुळे निश्चित केलेल्या कालावधी पेक्षाही एक दिवस अगोदरच पाणी पुरवठा सुरळीत करुन सांगली व कुपवाड मधील विस्तीर्ण भागातील लोकांना पाणी पुरवठा उपलब्ध करुन दिला. या जलशुद्धीकरण केंद्राकडील मोठी पाण्याची गळती दुरुस्ती करणेसाठी रात्रंदिवस काम करत असणारे कर्मचारी, अधिकारी,मक्तेदार यांच्या या कार्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- सौ.अनारकली जमीर कुरणे

अनुमोदक :- सौ.सुनंदा चंद्रकांत राऊत

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- १०१

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

वाळवा तालुका बौद्ध सोसायटी वाळवा चे न्यु हायस्कुल,सांगली ची विद्यार्थीनी कु.माहिया शकील शेख हीपे ऑल इंडिया स्पोर्ट फेडरेशन तर्फे पुणे जिल्ह्यातील बारामती या ठिकाणी घेण्यात आलेल्या तायक्वांदो स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. तीने या खेळात केलेल्या कामगिरीबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.प्रकाश शामराव मुळके

अनुमोदक :- श्री.संतोष शिवदास पाटीला

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- १०२

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२९/०९/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील TVS पोरेज शोरुम समोर स्व.मदनभाऊ पाटील यांचे स्मारक उभारणेत आले आहे. सदर ठिकाणच्या चौकास स्व.मदनभाऊ पाटील स्मारक चौक असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतीम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान

अनुमोदक :- श्री. उमेश पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- १०३

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२९/०९/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड मिरज रोड ते कुपवाड चावडीकडे जाणाऱ्या रस्त्यास माजी सरपंच कै.श्रीमती लक्ष्मीबाई बाबगोंडा पाटील (रुमाले) असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतीम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. उमेश पाटील

महापौर,

सहाय्यक आयुक्त

सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/१०/२०२१

महासभा क्रमांक :- ०५

ठराव क्रमांक :- १०४

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२९/०९/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१८ मधील तक्षीला रोड लगतच्या सि.स.नं.४२५/०५ जूना १२२/५ नविन या रेखांकनातील तनुहसन पार्क या नावाने नविन कॉलनी झाली असून, सदर कॉलनीस तनुहसन पार्क असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतीम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मेनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.उमेश पाटील

D/Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- १०५

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२९/०९/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१ कुपवाड मधील एस.टी.कॉलनी येथील अमृत योजनेतून पूर्ण झालेल्या उद्यानास धर्मवीर छ.संभाजी महाराज उद्यान असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतीम मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.गजानन रामू मगदूम यांनी दिलेल्या उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील कुपवाड येथील महादेव तालीम मध्ये अनेक नामांकित पैलवान घडत आहेत. या तालमीच्या मातीत कै.पै.विष्णू हजारे हे नामवंत पैलवान झाले आहेत. त्यांनी अनेक नामवंत कुस्त्या जिंकल्या आहेत. त्यांचे निधनानंतरही कुपवाड मध्ये या कुस्तीची परंपरा अखंड चालू आहे. यासाठी कै.पै.विष्णू हजारे यांचे नावाची किर्ती नेहमी कुपवाड मध्ये राहणेसाठी कुपवाड मिरज रोड वरील नामदेव थोरात घरासमोरील चौकास पै.विष्णू हजारे चौक असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्तिच केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, महापालिका क्षेत्रातील कुपवाड येथील महादेव तालीम मध्ये अनेक नामांकित पैलवान घडत आहेत. या तालमीच्या सुरुवातीपासून वस्ताद म्हणून कै.पै.वस्ताद भगवान हाके यांनी अनेक पैलवान या तालमीतून घडविले आहेत. त्यांनी अनेक नामवंत कुस्त्या जिंकल्या आहेत. त्यांचे निधनानंतरही कुपवाड मध्ये या कुस्तीची परंपरा अखंड चालू आहे. कै.पै.वस्ताद भगवान हाके यांचे नावाची किर्ती सांगली जिल्ह्यामध्ये प्रसिद्ध आहे. यासाठी कुपवाड मधील कुपवाड मिरज रोड वरील नामदेव थोरात घर ते वस्ताद भगवान हाके यांचे घराकडे जाणाऱ्या रस्तेस कै.पै.वस्ताद भगवान हाके मार्ग असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्तिच केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मेनुद्दीन बागवान

अनुमोदक :- श्री.उमेश पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- १०६

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग,मिरज) यांचे दि.२४/०९/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मिरज कृष्णाघाट,पंपींग स्टेशन परिसर व इमारती या सन २०१९ व २०२१ मध्ये आलेल्या महापुरामध्ये पुर्णत: पाण्यामध्ये बुडालेल्या होत्या. त्यामुळे महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील मिरज स.नं.५९३, कृष्णाघाट मिरज येथील महापालिकेच्या पंपींग स्टेशन आवारातील दोन इमारती धोकादायक झालेल्या आहेत. सदर इमारतीचे बांधकाम अंदाजे ५० वर्षापुर्वीचे असून, त्यामधील काहीसा भाग कोसळलेला आहे व भिंतीला चिरा पडलेल्या आहेत. त्यामुळे सदरची इमारत कोसळून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे सदरची इमारत पुर्ण उतरवून घेणे आवश्यक आहे. यासाठी मिरज स.नं.५९३, कृष्णाघाट मिरज येथील महापालिकेच्या पंपींग स्टेशन आवारातील धोकादायक झालेल्या दोन इमारती पाडणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयास अनुसरुन सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील सांगली येथील रेवणी रोडवरील फायर स्टेशन शेड क्र.१ तसेच, फायर स्टेशन शेड क्र.१ मागील कार्यशाळा वाहन पार्किंग इमारत,कार्यशाळेची इमारत व आर्युवेदीक दवाखाना इमारत या इमारती धोकादायक झालेल्या असून, सदरच्या इमारती तातडीने उतरवून घेणे आवश्यक असलेबाबत महापालिकेने नियुक्त केलेल्या पिनाका कन्सलटंन्सी सर्व्हिसेस यांनी स्टक्चरल ऑडिट करुन अहवाल दिलेला आहे. त्यानुसार उक्त इमारती धोकादायक झालेल्या असलेने कोणत्याही प्रकारची जिवित हानी होवू नये यासाठी सदर इमारती उतरवून घेणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयास अनुसरुन सन्मा.सदस्य श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज वॉर्ड क्र.५ येथील करण किशोर (दादा) जामदार सदस्य महानगरपालिका यांच्या विवाह प्रित्यर्थ स्वागत समारंभाचा कार्यक्रम घेणेसाठी मिरज हायस्कूल मिरज येथील क्रिडांगण मागणी केले आहे. सदर समारंभाच्या वेळी वाहतुकीस अडथळा निर्माण होणार असल्यामुळे मिरज हायस्कूल मिरज येथील क्रिडांगणाची भिंत समारंभा कार्यक्रमापुरती पाडणेस व सदर कार्यक्रम झालेनंतर त्यांनी स्वखर्चाने भिंत बांधून देण्याचे अटीवर मिरज हायस्कूल मिरज येथील भिंत पाडणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मेनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.उमेश पाटील

D.P.Suryavanshi
महापौर,

सहा.आयुक्त

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- १०८

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग,सांगली) यांचे दि.०६/०७/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजनेंतर्गत महापालिका क्षेत्रातील खालील नमुद १४ कामांचा र.रु.६०,९१,६९२/- मात्रचा प्रस्ताव सहा.अभियंता, सार्व.बांधकाम उपविभाग,मिरज यांचेकडून मा.जिल्हाधिकारीसो,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	रक्कम रुपये
१.	मिरज प्रभाग क्र.०३ मधील साई नंदन कॉलनी मधील महापालिकेच्या जागेस कंपौंड वॉल व ट्रॅक तसेच सुशोभिकरण करणे.	२४,९९,०००/-
२.	मिरज प्रभाग क्र.०५ मधील वैरण बाजार मधील रस्ता डांबरीकरण व सुशोभिकरण करणे	२०,४८,९२०/-
३.	आण्णाभाऊ साठे चौक मिरज सुशोभिकरण करणे	
४.	बसवेश्वर चौक मिरज	
५.	कर्मवीर भाऊराव चौक मिरज सुशोभिकरण करणे	
६.	स्वातंत्र्यवीर सावरकर चौक मिरज सुशोभिकरण करणे	
७.	अब्दुल करीम खाँ चौक मिरज सुशोभिकरण करणे	
८.	लोकमान्य टिळक चौक मिरज सुशोभिकरण करणे	
९.	अहिल्यादेवी चौक मिरज सुशोभिकरण करणे	१५,४३,७७२/-
१०.	महाराणा प्रताप चौक मिरज सुशोभिकरण करणे	
११.	डॉ.पाठक चौक मिरज सुशोभिकरण करणे	
१२.	महात्मा गांधी चौक मिरज सुशोभिकरण करणे	
१३.	डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक मिरज सुशोभिकरण करणे	
१४.	छत्रपती शिवाजी महाराज चौक मिरज सुशोभिकरण करणे	
	एकूण र.रु.	**६०,९१,६९२/-**

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या सौ.संगिता अभिजीत हारगे यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत महापालिका क्षेत्रातील खालील नमुद सात कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारीसो, जिल्हा नियोजन समिती,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेसाठी सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	रक्कम रुपये
१.	मिरज कृष्णाघाट रोड,जुना वांगी रस्ता चिदानंद मगदुम मळा ते निखिल जमनिस मळा ते विरुपाक्ष ताशिलदार मळा ते मळी रस्त्यापर्यत मुरुमीकरण करणे	२२,९८,६००/-
२.	जयगोंड कोरे मळा ते ऐनापुरे जुना निलजी बामणी रोड डांबरीकरण करणे	३७,७६,४००/-
३.	कृष्णा नदी लगतचा जिली बामणी रोड डांबरीकरण करणे प्रमुख जिल्हा मार्ग क्र.४४	१,०२,१९,०००/-
४.	प्रभाग क्र.२० रेल्वे गेट नं.२ ते निलजी हुडा ते ऐनापुरे मळा मुरुमीकरण करणे	५१,६५,०००/-
५.	कृष्णा घाट रस्तालगत असलेली एम.एस.ई.बी.समोरील रस्ता पुर्वेस जाणारा दरबंदर, बरगाले,चौधरी मेटेकरी,मेंढे, दुर्गाडे, मोमिन,हंडीफोडे,चौधरी पर्यतचा रस्ता रुंदीकरण,मुरुमीकरण व खडीकरण करणे.	३३,८१,६००/-
६.	माळी समाज स्मशानभूमीपासून रुईकर मळ्याकडे जाणारा मिरज ओढ्यावर छोटा पुल बांधणे	९६,७०,९४१/-
७.	बेडग रस्त्यापासून ढोले मळा मोतुगडे मळ्यापर्यत बी.बी.एम.व कारपेट करणे	२५,८३,९००/-

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

जिल्हा नियोजन समिती (डी.पी.डी.सी.) मधील सन २०१९-२० मध्ये व त्यानंतर वितरीत केलेल्या निधीतील बचत / शिल्लक राहिलेल्या रक्कमेतून सांगली माधवनगर बायपास रोड येथे सिग्नल बसविणे त्याचबरोबर प्रतापसिंह उद्यान येथे शिवसृष्टी देखावा तयार करणे ही कामे करणेसाठी निधी खर्च करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.शेडजी मोहिते ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव
मिरज आणि कुपवाड अनुमोदक :- श्री.पांडुरंग कोरे. D.P. Suryavarshi
महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- १०८

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग,सांगली) यांचे दि.११/१०/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्राचा गणुवत्तापूर्ण विकास करणेसाठी तसेच, शहराच्या विकासाचा दर्जा उंचाविणेसाठी वेगवेगळे प्रकल्प महापालिका प्रस्तावित करणार आहे. महापालिका क्षेत्रात वैशिष्ठ पूर्ण व गुणवत्तापूर्ण प्रकल्प राबविणे शहराच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यासाठी अशा प्रकारचे प्रकल्प राबविणारी भारत सरकारचा उपक्रम असलेली WAPCOS Limited या कंपनीने महापालिकेकडे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती होणेबाबत प्रस्ताव सादर केलेला असून, त्यामध्ये प्रत्येक प्रकल्पाकरीता राबविणेत येणाऱ्या कार्यपद्धत नमुद केलेली आहे. त्याच बरोबर प्रकल्प हाती घेण्यापूर्वी व पूर्ण करतेवेळी सर्व प्रकारचे मनुष्यबळ त्यांचेकडे उपलब्ध असलेची माहिती प्रस्तावात नमुद केले आहे. त्या अनुषंगाने सर्व प्रक्रिया राबविणेबाबत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क म्हणून १.९०% दराने काम करणेची तयारी दर्शविली असून, सदर कंपनीकडून तयार करणेत आलेल्या प्रकल्पास मान्यता न मिळालेस कंपनीस कोणतेही शुल्क देय होणार नाही. या बाबींचा विचार करता, महापालिका क्षेत्रातील विविध विकास कामांच्या प्रकल्पाकरीता WAPCOS Limited या कंपनीची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते. D. P. Suryavanshi
महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- १०९

विषय क्रमांक :- ११

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग,सांगली) यांचे दि.११/१०/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग,सांगली कर्नाळ रोड जॅकवेल रॉ वॉटर पंप हाऊस येथील ट्रान्सफॉर्मर यार्ड व व्ही.सी.बी.रुम महापुरामुळे पाण्यात जात असल्याने ते योग्य उंचीवर चढवून नविन बांधणे इत्यादी अनुशंगिक कामगिऱ्या करणेची तांत्रिक सेवा सल्लागाराच्या अदा होणेच्या सेवा शुल्कसह अंदाजित खर्च र.रु.२,६४,४४,९००/- च्या कामगिरीसाठी १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून ई-महाटेंडर पद्धतीने निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रात नमुद केलेनुसार सन २०२१-२२ महानगरपालिका अर्थसंकल्पीय तरतुद ई -१२१०) १५ वे वित्त आयोगा या लेखाशिर्षातून करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधा विकसनासाठी राज्यशासनाचे मुलभूत सोयी-सुविधांसाठीचे विकास अनुदान, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (राज्यस्तर) मधून अथवा अन्य कोणत्याही योजनेतून महापालिका क्षेत्रातील खालील नमुद चार कामांचा प्रस्ताव राज्यशासनाकडे प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेसाठी सादर करणेस ही सभा मान्यता देत असून, याकामी योजनेसाठीच्या सर्व अटी-शर्तींचे पालन करणेस व त्यासाठी आवश्यक स्व:हिस्सा भरण्यास ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	रक्कम रुपये
१.	राजश्री छत्रपती शाहू महाराज मार्ग १०० फुटी रस्ता विकसीत करणे	४० कोटी
२.	कुपवाड शहर व परिसरातील डी.पी.व अंतर्गत रस्ते विकसीत करणे	६० कोटी
३.	सांगली शहरातील पुर बाधीत क्षेत्रातील व डी.पी.रोड करणे.	८० कोटी
४.	मिरज शहरातील पूर बाधीत क्षेत्रातील व डी.पी.रोड करणे.	७० कोटी
	एकूण र.रु.	२५० कोटी

सूचक :- श्री.शेडजी मोहिते

अनुमोदक :- श्री.विष्णू माने

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryavanshi.

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- ११०

विषय क्रमांक :- १२

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग,सांगली) यांचे दि.११/१०/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग,सांगली माळबंगला ५६ एम.एल.डी.जलशुद्धीकरण केंद्रसाठी नविन संप व पंप हाऊस बांधणे अनुशंगिक कामगिरी करणेची तांत्रिक सेवा सल्लागाराच्या अदा होणेच्या सेवा शुल्कसह अंदाजित खर्च र.रु.२,४८,८८,७०१/- च्या कामगिरीसाठी १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून ई-महाटेंडर पद्धतीने निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रात नमुद केलेनुसार सन २०२१-२२ महानगरपालिका अर्थसंकल्पीय तरतुद ई -१२१०) १५ वे वित्त आयोगा या लेखाशिर्षातून करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.उमेश पाटील

Dfsuryavanshi
महापौर,

पाणीपुरवठा प्रशासन